# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)
शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१
दू.क्र.: ०२२-६२५४२१००/१०५/१०७

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : secretary@msbte.com

**महत्वाचे परिपत्रक**

जा.क्र. मरातंशिमं/का-४२/उ.प.२०२०/ 283
दिनांक : 28 SEP 2020

प्रति,
प्राचार्य,
अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यता प्राप्त
मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था. (अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र)

विषय :- **उन्हाळी परीक्षा २०२० - ऑनलाईन MOCK Test (सराव परीक्षा) देणेबाबत...**
संदर्भ :- मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. MSBTE/D-42/S20 exam/2020/280, दि. २४.०९.२०२०.

अंतिम सत्र/वर्षाच्या विद्यार्थ्यांना उन्हाळी परीक्षा २०२० च्या ऑनलाईन परीक्षेचा सराव होण्याकरीता दि. ३०.०९.२०२० व दि. ०१.१०.२०२० रोजी ऑनलाईन MOCK Test (सराव परीक्षा) आयोजित करण्यात येणार असल्याबाबत संदर्भिय महत्वाच्या परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी दि. ३०.०९.२०२० व दि. ०१.१०.२०२० रोजी होणा-या ऑनलाईन MOCK Test ही सराव परीक्षा दयावी. या सराव परीक्षेच्या वेळा खालीलप्रमाणे राहतील.

| अ.क्र. | परीक्षेचा दिनांक | कालावधी |
|---|---|---|
| १. | दि. ३०.०९.२०२० | सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत |
| २. | दि. ०१.१०.२०२० | सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत |

सदर परीक्षेसाठी आवश्यक असणारे Login ID, Password व Link इत्यादी त्यांनी, मंडळाकडे नोंदणी केलेल्या मोबाईलवर SMS द्वारे दि. २९.०९.२०२० रोजी पाठविण्यात येतील. सदर Login ID, Password हे दि. ०६.१०.२०२० पासून सुरु होणा-या ऑनलाईन उन्हाळी परीक्षा २०२० करीता सुध्दा वापरात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी उन्हाळी २०२० ची परीक्षा संपेपर्यंत ते सांभाळून ठेवावेत. ऑनलाईन परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना काही अडचण आल्यास, त्यांनी आपल्या संस्थेतील विभागीय समन्वयक (Departmental Coordinator) यांच्याशी संपर्क साधावा. विभागीय समन्वयकाचा मोबाईल नंबर विद्यार्थ्यांना SMS द्वारे कळविला जाईल. सराव परीक्षा देण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी वरील संदर्भिय परिपत्रकात दिलेल्या Instructions/Guidelines वाचून त्यांचे तंतोतंत पालन करावे.

सर्व संस्था प्रमुखांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे व दि. ३०.०९.२०२० व दि. ०१.१०.२०२० रोजी होणा-या ऑनलाईन MOCK Test सराव परीक्षेस सर्व विद्यार्थी बसतील याची दक्षता घ्यावी.

(वि. र. जाधव)
प्र.सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी –
उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद.